दिनांक 12 मे, 2016

# धडगाव तालुका व परिसरातील दिवाळीपूर्वी 73 वाड्या, पाड्यांना महसुली गावाचा दर्जा देणार

- ???????? ????

नंदुरबार, दि. 12 : धडगाव तालुका व परिसरातील दिवाळीपूर्वी 73 वाड्या, पाड्यांना महसुली गावाचा दर्जा देण्यात येईल. आगामी काळात मोलगी येथे विविध विभागांची शासकीय कार्यालये कार्यान्वित करीत मोलगीला तालुक्याचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांनी केले आहे.

राज्य शासनाच्या मत्स्य व्यवसाय विभागातर्फे सरदार सरोवर प्रकल्पग्रस्त मच्छिमार सहकारी संस्थांना साहित्य वाटप व शीत वाहन लोकार्पण सोहळा अक्कलकुवा येथील नवोदय विद्यालयाच्या सभागृहात श्री. खडसे यांच्या हस्ते झाला त्यावेळी ते बोलत होते. आमदार उदेसिंग पाडवी, माजी आमदार डॉ. नरेंद पाडवी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय विभागाचे प्रधान सचिव विजयकुमार, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव इक्बालसिंह चहल, मत्स्य व्यवसाय विभागाचे आयुक्त मधुकर गायकवाड, जिल्हाधिकारी मल्लिनाथ कलशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जी. सी. मांगळे, डॉ. शशिकांत वाणी, नागेश पाडवी, दिपक पाटील आदी यावेळी उपस्थित होते.

श्री. खडसे म्हणाले, की मोलगी येथे विविध शासकीय कार्यालये कार्यान्वित झाल्यावर तालुका निर्मितीचा धोरणात्मक निर्णय घेताना मोलगी तालुक्यासाठी प्राधान्य देण्यात येईल. नर्मदा नदीवरील सरदार सरोवर प्रकल्प देशातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्याचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. या प्रकल्पामुळे विस्थापितांचा सर्वांगीण विकास व्हावा, अशी शासनाची भूमिका आहे. विस्थापितांना त्यांचा हक्क मिळावा, त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणून शासनातर्फे वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मच्छिमार सहकारी संस्थांना साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. यामुळे विस्थापितांना पूरक व्यवसायासाठी साधने उपलब्ध होतील. रोजगाराच्या संधी वाढतील. मिळालेल्या साहित्याचा संबंधित लाभार्थी योग्य विनियोग करतील. त्याचे चांगले परिणाम पाहावयास मिळतील. प्रकल्पग्रस्तांपर्यंत विविध योजना पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असेही त्यांनी नमूद केले. सरदार सरोवर प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी प्राधान्य देण्याच्या, समस्या सोडविण्याच्या सूचना पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी दिल्या आहेत.

सरदार सरोवर प्रकल्पामुळे राज्याला 27 टक्के वीज उपलब्ध होणार असून, विस्थापित होणाऱ्यांच्या सर्व समस्या मार्गी लावण्यासाठी शासन सकारात्मक आहे. राज्याचा पुनर्वसन मंत्री या नात्याने प्रकल्पबाधितांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यात येतील. विस्थापितांना कृषी विभागाच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत, असेही श्री. खडसे यांनी नमूद केले. नंदुरबार जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येईल.

वन, शासकीय योजनांवर आदिवासी बांधवांचा पहिला हक्क आहे. वन हक्क कायद्यानुसार आदिवासी बांधवांना वनहक्क, वनपट्टे गावागावात जावून मिळवून देण्यासाठी विशेष कार्यक्रम तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पेसा कायद्यांतर्गत ग्रामपंचायतींना थेट निधी उपलब्ध होणार आहे. या भागातून चौपदरी रस्त्याला मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे वाहतूक सुलभ होण्यास मदत होईल, असेही मंत्री श्री. खडसे यांनी सांगितले. शासनाच्या आदिवासी बांधवांसाठी असलेल्या वेगवेगळ्या विभागांच्या विविध योजनांचे एकत्रीकरण करुन त्यांचा लाभ एकाच छताखाली मिळावा म्हणून राज्य सरकार विचार करीत आहे.

आमदार उदेसिंग पाडवी यांनी सांगितले, की प्रकल्पग्रस्त आदिवासी बांधवांच्या मच्छिमार सहकारी संस्थांना मिळालेल्या साहित्यामुळे व्यवसायासाठी प्रोत्साहन मिळेल ते स्वावलंबी होतील. संस्था स्वयंपूर्ण होतील, असा विश्वास व्यक्त केला. श्री. विजयकुमार म्हणाले, की सरदार सरोवर प्रकल्पामुळे तयार झालेल्या जलाशयामुळे मत्स्य व्यवसायाची संधी उपलब्ध झाली आहे. एवढेच नव्हे, तर विस्थापित कुटुंबांच्या उत्पन्नात भर पडेल. यांत्रिक नौका, साहित्यामुळे मत्स्य उत्पादन वाढेल. मच्छिमार संस्थांना तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी प्रयत्न करु, असेही त्यांनी नमूद केले. आयुक्त श्री. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. मत्स्य व्यवसाय विभागाच्या सहाय्यक अधिकारी भक्ती पेजे यांनी सूत्रसंचालन करुन आभार मानले.

0 0 0 0 0 0 0 0 0 0